# प्रेसनोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला
दिनांक १६/०७/२०२५

| | | |
|---|---|---|
| | युनिटचे नांव | अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला, घटक |
| | आरोपीचे नांव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | आलोसे श्री. भागवत परसराम कांबळे, वय–५५वर्ष, पद–सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, ब.नं. ११०१, पो.स्टे. दहीहांडा जि. अकोला रा. नविन नागफैल, लेबर कॉलीनी, भवानी पेठ ता.जि. अकोला |
| ३ | मागणी केलेली लाच रक्कम | १,००,०००/– रूपये |
| ४ | तडजोडी अंति मागणी केलेली लाच रक्कम | ५०,०००/– रूपये |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | ५०,०००/– रूपये |
| ६ | सापळा तारीख | दिनांक–१६/०७/२०२५ |
| ७ | घटनास्थळ | अकोला ते अकोट रोडवरील कासली फाटा, ता.जि. अकोला . |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील तक्रारदार यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन दहीहांडा जि. अकोला येथे अप.क्र. १७९/२०२५ कलम ३०३(२) बि.एन.एस. २०२३ अन्वये गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयाचे तपास संबंधाने तक्रारदारला देण्यात आलेल्या भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम ३५(२) अन्वये दिनांक २७/०६/२०२५ रोजी तक्रारदार हे पोलीस स्टेशन दहीहांडा येथे समक्ष हजर येवुन आलोसे श्री. भागवत कांबळे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक यांना भेटले असता, त्यांनी तक्रारदारला "मी तुझ्याविरूध्द दाखल गुन्हयामध्ये तुला मदत करतो, त्याकरीता तु मला १,००,०००/– रूपये आणुन दे" असे म्हणुन लाच रकमेची मागणी केली. आलोसे यांनी तक्रारदाराकडे मागणी केलेली लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नसल्याने तक्रादारने त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता दिनांक ३०/०६/२०२५ रोजी लाप्रवि. अकोला कार्यालयात तक्रार दिली.

सदर तक्रारीवरून दिनांक ३०/०६/२०२५ रोजी केलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान आलोसे श्री. भागवत कांबळे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, पो.स्टे. दहीहांडा जि. अकोला यांनी तक्रारदाराकडे तडजोडी अंति ५०,०००/– रूपये लाच रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर आज दिनांक १६/०७/२०२५ रोजी अकोला ते अकोट रोडवरील कासली फाटा येथे सापळा कार्यवाही आजमाविली असता, आलोसे श्री. भागवत परसराम कांबळे, वय–५५ वर्ष, पद–सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, ब.नं. ११०१, पो. स्टे. दहीहांडा जि. अकोला यांनी तक्रारदार यांच्या कडुन पंचासमक्ष ५०,०००/– रूपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना तात्काळ ताब्यात घेण्यात आले असुन पुढील कार्यवाही सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. मारूती जगताप, लाप्रवि अमरावती, पोलीस अधिक्षक, श्री.सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधिक्षक, लाप्रवि अमरावती, श्री. मिलींदकुमार बहाकर, पोलीस उप अधिक्षक, लाप्रवि अकोला यांचे मार्गदर्शनाखाली श्री. प्रविण वेरूळकर, पोलीस निरीक्षक,लाप्रवि अकोला, श्री.अतुल इंगोले, पोलीस निरीक्षक, लाप्रवि अकोला, पोलीस अंमलदार डिगांबर जाधव, संदिप ताले, अभय बावस्कर, असलम शाह, प्रदिप गावंडे व श्रीकृष्ण पळसपगार यांनी केली.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते कि, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा.

ईमेलः– dyspacbakl@gmail.com
ऑफिस फोन नं. ०७२४–२४१५३७०
टोल फ्रि क्रं. १०६४

१६/०७/२५
(प्रविण वेरूळकर)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला